**ठळक बातम्या**

- अयोध्येतल्या श्रीराममंदिरात धर्मध्वजारोहण सोहळा प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत संपन्न

- ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, तिथं आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडू नका, अशी सर्वोच्च न्यायालयाची सूचना

- ज्येष्ठ विचारवंत आणि अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांना यंदाचा समता पुरस्कार जाहीर

**आणि**

- गुवाहाटी कसोटी क्रिकेट सामन्यात दक्षिण अफ्रिकेचा डाव ५ बाद २६० वर घोषित, भारताच्या दिवसअखेर २ बाद २७ धावा

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज अयोध्येमधल्या राम मंदिरावर धर्मध्वजारोहण झालं. राममंदिराचं बांधकाम पूर्ण झाल्यानिमित्त हे ध्वजारोहण करण्यात आलं आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**----व्हीसी----**

*(विवाह पंचमीच्या मुहुर्तावर होत असलेल्या धर्मध्वज सोहळ्यानिमित्त देशभरातून हजारो भाविक अयोध्यानगरीत जमले असून सर्वत्र जय श्रीरामचा जयघोष आणि शंखध्वनी ऐकू येत आहे. यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी अयोध्येत रोड शो केला आणि राम मंदिर परिसरातल्या विविध मंदिरांना भेट देऊन तिथे पूजा केली. प्रधानमंत्र्यानी सप्तमंदिर, शेषावतार मंदिर तसंच अन्नपूर्णा देवीच्या मंदिराला भेट दिली तसंच रामलल्लाच्या गर्भगृहात पूजा केली. त्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत धर्म ध्वजारोहण झालं. उगवता सूर्य आणि कोविदार वृक्षासह ओम ची प्रतिमा असलेला हा भगवा ध्वज दहा फूट उंच, वीस फूट लांब असून श्रीरामाचं शौर्य आणि अलौकिक तेजाचं प्रतीक मानला जात आहे.)*

**धर्मध्वजारोहणाच्या** या सोहळ्यानिमित्त अयोध्यानगरी आज भारताच्या सांस्कृतिक जाणिवेच्या सर्वोच्च क्षणाची साक्षीदार बनली असून संपूर्ण देश आज राममय झाला आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलं. प्रधानमंत्र्यांनी सर्वांना धर्मध्वज सोहळ्याच्या शुभेच्छा दिल्या. तसंच अयोध्येतील राम मंदिराच्या निर्माणासाठी ज्यांनी योगदान दिलं त्यांचं अभिनंदन केलं. यावेळी उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ इतर मान्यवर आणि शेकडो भाविकजन उपस्थित होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी कुरुक्षेत्र इथं गुरू तेग बहादूर यांच्या साडेतीनशेव्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी झाले. याप्रसंगी त्यांनी विशेष नाणं आणि टपाल तिकीटाचं अनावरण केलं. यावेळी हरियाणाचे राज्यपाल असीम कुमार घोष, मुख्यमंत्री नायबसिंह सैनी आणि हरियाणा शीख गुरुद्वारा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जगदीश सिंग झिंडा उपस्थित होते

त्याआधी प्रधानमंत्री मोदी यांनी भगवान श्रीकृष्णाच्या शंखाच्या सन्मानार्थ पांचजन्य इमारतीचंही आज उद्घाटन केलं. तसंच श्रीमद्भगवत गीतेच्या उगमाशी संबंधित ब्रह्मसरोवर इथं पूजा केली.  गुरू तेग बहादूर यांच्या साडेतीनशेव्या जयंतीनिमित्त या वर्षी वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

**<><><><><>**

नवीन कामगार कायद्यांमुळे ७७ लाख अतिरिक्त रोजगार निर्माण होऊन बेरोजगारीत १ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांपर्यंत घट होईल, असा अंदाज भारतीय स्टेट बँकेच्या एका अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. २१ नोव्हेंबरपासून लागू झालेल्या या कायद्यांमुळं संघटित कामगारांचं प्रमाण किमान १५ टक्क्यांनी वाढून सुमारे साडे ७५ टक्क्यांपर्यंत जाईल. आजघडीला हे प्रमाण ६० पूर्णांक ४ दशांश टक्के असल्याचा अंदाज आहे. सध्या देशभरात असंघटित क्षेत्रातल्या कामगारांची

संख्या सुमारे ४४ कोटी इतकी असून त्यापैकी जवळपास ३१ कोटी कामगारांनी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी केली आहे. नव्या कामगार कायद्यांमुळे कामगारांना मिळणारं सामाजिक सुरक्षा कवच पुढच्या २ ते ३ वर्षांमध्ये ८० ते ८५ टक्के कामगारांपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, तिथं आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडू नका, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयानं आज निवडणूक आयोगाला केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली जात असल्याप्रकरणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठासमोर आज सुनावणी झाली. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाशी चर्चा सुरू असल्याची माहिती राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयाला दिली. त्यानंतर पीठानं या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारपर्यंत पुढे ढकलली. २ डिसेंबर रोजी होणाऱ्या २४२ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये ५७ संस्थांमध्ये आरक्षणाची कमाल मर्यादा ओलांडली जात असल्याची माहिती निवडणूक आयोगाचे वकील बलबीर सिंह यांनी दिली. त्यावर, या प्रकरणाच्या निकालावर हे अतिरिक्त आरक्षण अवलंबून असेल, अशी तोंडी टिप्पणी सरन्यायाधीशांनी केली.

**<><><><><>**

आगामी नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज अमरावती आणि अकोला जिल्ह्यात प्रचारसभा घेतल्या. शहरी जीवनमान बदलण्यासाठी आपल्याकडे स्पष्ट आराखडा आहे, या आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी जनतेचा विश्वास आणि मतांची ताकद

आवश्यक आहे. त्यामुळे योग्य उमेदवाराला निवडून द्या असं आवाहन त्यांनी केलं. धारणी इथंही मुख्यमंत्र्यांनी प्रचारसभा घेतली.

**<><><><>**

यंदाचा समता पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत आणि अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांना देण्यात येणार आहे. महात्मा फुले यांची १३५वी पुण्यतिथी आणि समता दिनानिमित्त येत्या शुक्रवारी हा पुरस्कार प्रदान सोहळा होणार असल्याची माहिती अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेनं आज पत्रकार परिषदेत दिली.

**<><><><>**

५६वा इफी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज कलाकार आणि सिनेप्रेमींनी दिवंगत अभिनेता धर्मेंद्र यांना श्रद्धांजली अर्पण केली. आज इफीमध्ये ‘द लास्ट वायकिंग - माय फादर्श शॅडो’, ‘ब्लॅक रॅबिट, व्हाइट रॅबिट’ हे चित्रपट भारतात पहिल्यांदा प्रदर्शित झाले. महोत्सवाच्या जागतिक विभागात ‘ट्रान्स्परंट लँड्स’ या रशियन चित्रपटाचंही प्रदर्शन झालं. साईनाथ उकसाईकर यांनी दिग्दर्शित केलेला ‘माय डॅड इन्व्हेंटेड द वडापाव’ हा लघुपट आज इफीत दाखवण्यात आला. याशिवाय विविध विभागांमध्ये चित्रपट आज इफीत दाखवले जात आहेत.

**<><><><>**

नवी दिल्लीत संविधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात उद्या संविधान दिनाचा कार्यक्रम होणार आहे. भारताने १९४९ साली याच दिवशी संविधानाचा स्वीकार केला होता. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभा सभापती ओम बिर्ला तसंच संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य यात सहभागी होतील. या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या नेतृत्वात संविधानाच्या प्रस्तावनेचं वाचन केलं जाईल. तसंच संविधानाच्या ९ विविध भारतीय भाषांमधल्या प्रतींचं आणि एका विशेष स्मरणिकेचे प्रकाशन होईल.

संविधान दिनानिमित्त राज्यात विविध कार्यक्रम होणार असून २६/११च्या मुंबई हल्ल्यात शहीद झालेल्यांचं स्मरण करण्यात येईल. परभणीत सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागानं परभणीच्या शिवाजी महाविद्यालयात ‘घर घर संविधान’ हा कार्यक्रम उद्या आयोजित केला आहे.

**<><><><><>**

गुवाहाटी इथं बारसापारा स्टेडियमवर भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सुरु असलेल्या दुसऱ्या आणि अंतिम कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशीचा खेळ आज संपला तेव्हा भारताच्या २ बाद २७ धावा झाल्या होत्या. सलामीचे फलंदाज यशस्वी जैस्वाल आणि के एल राहुल बाद  झाल्यानंतर मैदानात आलेले साई सुदर्शन २ धावांवर आणि कुलदीप यादव ४ धावांवर खेळत होते. याआधी दक्षिण आफ्रिकेने ५ बाद २६० धावांवर डाव घोषित केला होता. त्यामुळे आता सामना जिंकण्यासाठी भारतासमोर ५४९ धावांचं  आव्हान आहे. पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेनं ४८९ धावा तर भारताने २०१ धावा केल्या होत्या. कोलकात्यात ईडन गार्डन इथे झालेला पहिला कसोटी सामना दक्षिण आफ्रिकेने जिंकला होता.

**<><><><><>**

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अर्थात एनपीएस अंतर्गत येणारे पात्र कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांना एकात्मिक निवृत्तीवेतन योजना म्हणजेच यूपीएस स्वीकारण्यासाठी ३० नोव्हेंबर ही शेवटची तारीख असेल, अशी माहिती अर्थमंत्रालयानं दिली आहे. यासाठी त्यांना सीआरए यंत्रणेद्वारे ऑनलाईन अर्ज करता येईल, किंवा प्रत्यक्ष अर्ज स्थानिक नोडल कार्यालयात जमा करता येईल.
यूपीएस अंतर्गत, योजना बदलण्याची संधी, करात सवलत, राजीनामा आणि सक्तीच्या निवृत्तीचे फायदे असे अनेक लाभ कर्मचाऱ्यांना मिळतात. ते मिळवण्यासाठी केंद्र सरकारचे सर्व पात्र कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांनी वेळेवर अर्ज करावा, असं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

**<><><><><>**

यंदाच्या रब्बी हंगामात या महिन्याच्या २१ तारखेपर्यंत ३ कोटी ६ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणी देशभरात झाली आहे. सुमारे ७३ लाख हेक्टर क्षेत्रावर कडधान्यांची लागवड करण्यात आली आहे, १९ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रात भरड धान्याची तर ७६ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर तेलबियांची लागवड झाली असल्याचं कृषी विभागानं प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत राज्यात सर्वत्र कोरडं हवामान राहील, असा अंदाज हवामान शास्त्र विभागानं वर्तवला आहे.

//<><><><><>//